**भारतीय रिझर्व्ह बँक**
**विदेशी मुद्रा विभाग**
**केंद्रीय कार्यालय, मुंबई — ४०० ००१**

आर बी आय २०४/१५३
एपी (डीआय आर रिरिज) परिपत्रक क्रं. ८६/

एप्रिल १७, २००४

प्रति
सर्व अधिकृत विदेशी मुद्रा विक्रेते

महोदय / महोदया,

**फेमा १९९९**
**चालू खात्यावरील व्यवहार**
**विदेशास्थित निकटवर्ती नातेवाईकांच्या निर्वाहासाठी देकार विदेशी कंपन्यांकडून भारतात अस्थायी नेमणुंकीवर पाठवलेल्या भारतीय नागरिकांचे अर्ज / विनंती**

अधिकृत विक्रेत्यांचे लक्ष क्रं७ — परिशिष्ट ३ - भारत सरकार एस ओ ३०१ (ई) सूचना क्र जी एस आर ३८१ ता. मे ३, २००० व सूचना क्रं. ता. मार्च ३० २००१ चा त्यातील बद्दल यांचेकडे वेधण्यात येत आहे. या सूचनांनुसार जे विदेशी नागरिक (पाकिस्तानी नागरिक वगळून) भारतात त्यांचे रहिवासी आहेत, पण कायमचे रहिवासी नाहीत, त्यांना त्यांचे निव्वळ वेतन (कर, निर्वाहनिधी व इतर कपाती वजा करुन) विदेशास्थित निकटच्या नातेवाईकांच्या निर्वाहासाठी पाठवण्याची अनुमती आहे. सध्या विदेशी कंपन्यांनी भारतात पाठवलेल्या अशाच भारतीय नागरिकांच्या नातेवाईकांच्या निर्वाहाचे अर्ज भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठवाने लागतात.
२) तपासणी अंती विदेशी नागरिकांना निव्वळ पगार पाठवण्यासाठी असलेली सवलत (पाकिस्तानी नागरिक वगळून) विदेशी कंपनीने (भारतात अस्थायी / प्रभारी) त्यामुळे त्यांचे कार्यालय, शाखा, उपकंपनी, संयुक्त धाडस यात कामांसाठी पाठवलेल्या भारतीय नागरिकासाठी, विदेशस्थित जवळच्या नातेवाईकांच्या निर्वाहासाठी निव्वळ पगारा (कर, निर्वाह निधी व इतर कपाती वजा करुन) एवढी रक्कम अधिकृत विक्रेते पाठवू शकतील. या संदर्भातिल भारत सरकारच्या सूचनेची क्रं. जीएसआर-१९७ (ई) ता. मे १, २००३ ची प्रत सोबत जोडली आहे.
३) अधिकृत विक्रेत्यांनी त्यांच्या संलग्न संस्थांना या परिपत्रकातील मजकूर कळवावा.
४) या परिपत्रकातील निर्देश कलम १०(४) व ११(४) हे फेमा (१९९९ चा ४२) या खाली दिलेले आहेत.

**आपला विश्वासू**
**ग्रेस कोशी**
**मुख्य महाव्यवस्थापक**

**वित्त व कंपनी कामकाज मंत्रालय**
**आर्थिक  कामकाज विभाग**
**अधिसूचना**
**नवी दिल्ली दि. १ मे २००३**

**जी एस आर ३१७ (ई)** कलम ५ आणि पोटकलम (१) आणि पोटकलम (२) अ, विदेशी मुद्रा कलम ४६ चे
व्यवस्थापन कायदा १९९९ (४२ ऑफ १९९९) अन्वये दिलेल्या अधिकारांखाली व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानुसार, जनहितार्थ आवश्यक असल्याने, खालील बदल विदेशी व्यवस्थापन (चालू खात्यावरील व्यवहार) अधिनियम २००० मध्ये केले जात आहेत.

**१. संक्षिप्त शीर्षक व सुरुवातः**

१) या नियमांना विदेशी मुद्रा व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) (दुसरी दुरुस्ती) नियम २००० असे म्हटले जाईल.

२) ते अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध केल्यापासून लागू होतील.

२) विदेशी मुद्रा व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम २००० (ए) परिशिष्ट क्र. १ च्या क्र. ६ ऎवजी खालील वर्णन असेल “ ६ रुपयातील शासकीय पतप्रणाली खाली निर्यातीवरील दलाली, चहा व तंबाखूच्या निर्यातीवरील विक्री किंमतीच्या १०% पर्यंतची दलाली सोडून”
(ब) परिशिष्ट ३ क्र. ७ मधे
(ए) पोटकलम (१) ऐवजी खालील पोटकलम येईल.
(१) निव्वळ वेतना (कर, भविष्य निर्वाह निधी व इतर कपाती वजा करुन) च्या वर
भारतात निवासी असलेल्या परंतु कायम निवासी नसलेल्या व्यक्तीच्या आणि
अ) जो पाकिस्तान सोडून इतर परदेशाचा नागरिक असेल
ब) भारताचा नागरिक, ज्याला विदेशी कंपनीने प्रतिनिधिक स्वरुपात कार्यालयात, शाखेत, भारतीय उपकंपनीत अशा कंपनींच्या संयुक्त उपक्रमात नेमले आहे
बी) स्पष्टीकरणात “ची नेमणूंक” या शब्दां ऎवजी” ची नेमणूक वा ची प्रतिनिधिक नेमणूक “ हे शब्द ठेवले जातील
(एफ क्र. १/१५/ईसी/ २००० व्हॉल्यूम २)

**जी एस दत्त**
**संयुक्त चिटणीस**

तळटीप : मुख्य अधिनियम सरकारी राजपत्रात जी एस आर ३८१ (ई), दि. ३ मे २००० अन्वये भाग २, कलम ३, पोटकलम (१) अन्वये प्रकाशित केले गेले व नंतर एस ओ ३०१ (ई) ता. ३० ने बदलले गेले.